# लिलावातील बदल 'पीएमपी'साठी फायद्याचे

म. टा. प्रतिनिधी, पुणे

पुणे महानगर परिवहन महामंडळाने (पीएमपी) स्क्रॅप बसची किमान किंमत ठरविण्यासाठी पहिल्यांदाच सरकारमान्य मूल्यनिर्धारकाची नेमणूक करून, लिलाव प्रक्रियेत बदल केल्याने स्क्रॅप बस आणि साहित्यापासून 'पीएमपी'ला अंदाजे साडेपाच कोटी रुपये जास्त उत्पन्न मिळणार असल्याचे 'पीएमपी'ने स्पष्ट केले.

आयुर्मान संपलेल्या किंवा १२ लाख किमीपेक्षा जास्त धावलेल्या बस स्क्रॅप करण्यात येतात. २१ डिसेंबरपूर्वी घेण्यात आलेल्या लिलावात स्क्रॅप बस, इतर साहित्य ठेवण्यात आले होते. मात्र, त्याला अल्प बोली लावण्यात आली. त्यामुळे विक्री करण्यात आली नाही. या लिलावात १९७ बस, दोन टेम्पो आणि इतर सामान ठेवण्यात आले होते. मात्र, पुन्हा लिलाव करताना पीएमपी प्रशासनाने पहिल्यांदा ऑनलाइन लिलाव प्रक्रिया राबवली. ऑफलाइन लिलावाचीसुद्धा सोयं करण्यात आली. त्यातून अधिक उत्पन्न मिळणार असल्याचे पीएमपी प्रशासनाने स्पष्ट केले.

> 'पीएमपी'च्या वतीने स्क्रॅप बस आणि भंगारात देण्यासाठीच्या साहित्याचा लिलाव करण्यात येतो. या लिलाव प्रक्रियेतून अधिक उत्पन्न मिळविण्यसाठी आवश्यक बदल करण्यात येतील.
>
> – राजेंद्र जगताप, अध्यक्ष, पीएमपी

## अशी आहे नवीन पद्धत

बसच्या कंपनीप्रमाणे पाचच्या संख्येने समूह तयार करण्यात आले. या वेळी स्क्रॅप बसची किमान किंमत ठरविण्यासाठी सरकारमान्य मूल्यमापन करणाऱ्यांची नेमणूक करण्यात आली. या वेळी लिलावात जास्तीत जास्त जण सहभागी व्हावेत यासाठी लॉटप्रमाणे वेगवेगळे शुल्क न ठेवता बससाठी दोन लाख आणि साहित्यासाठी एक लाख रुपये ठेवण्यात आली होती.

CS Scanned with CamScanner

# पीएमपीच्या भंगार मालाच्या लिलावात बदल

प्रतिनिधी @ नवराष्ट्र

## लिलावदारांची संख्या वाढली

**पुणे** : पीएमपीएलच्या ( पुणे महानगर परीवहन महामंडळ ) प्रशासनाने भंगार बसेस आणि सुट्याभागाच्या लिलाव प्रक्रीयेत बदल केला आहे. यामुळे साधारणपणे साडे पाच कोटी रुपयांपर्यंत उत्पन्न मिळेल असा अंदाज प्रशासनाने व्यक्त केला आहे.पीएमपी कडील बंद असलेल्या जुन्या बसेस भंगारात काढल्या जातात. त्याचप्रमाणे सुटेभागांप्रमाणे या बसेसही जाहीर लिलावाद्वारे विकल्या जातात. नुकतेच प्रशासनाने काही बसेस आणि सुट्याभागांचा समावेश असलेल्या भंगार मालाचा लिलाव जाहीर केला होता.



**पीएमपीने १९७ बसेस २ टेम्पो काढले भंगारात**

**३६ लॉट विक्रिसाठी ठेवले**

यामध्ये अतिअल्प बोलीने किमत आली होती . यामुळे या भंगार मालाची विक्री पीएमपीने केली नाही . परंतु, प्रशासनाने लिलाव प्रक्रीयेत बदल केल्याचे परीणाम दिसु लागले आहे . २१ डिसेंबर रोजी पीएमपीने १९७ बसेस २ टेम्पो व इतर मटेरियलचे ३६ इतके लॉट विक्रिसाठी ठेवले होते . लिलाव प्रक्रियेत बदल केल्याने पुर्वीच्या तुलनेत जास्त बोलीच्या किंमती मालास मिळाल्याची माहीती व्यवस्थापकीय संचालक डॉ . राजेंद्र जगताप यांनी कळविली आहे .

स्क्रॅपमध्ये काढण्यात येणाऱ्या बसेसचे उत्पादक कंपनीनिहाय पाच बसचा एक लॉट असे लॉट तयार केले गेले. या मालाची किंमत ही शासकीय 'व्हॅल्युअर'ची नेमणूक केली जाते, यावेळी त्याच्याकडून ठरविली गेलेली किंमत ही बंद लिफाफ्यात घेतली गेली. खात्याअंतर्गत स्क्रॅप कमिटी करणेत आली होती. सदर कमिटीमध्ये पुणे मनपा, पिंपरी चिंचवड मनपा,आर टी ओ कडील अधिकारी व महामंडळाचे अधिकारी यांचा समावेश केला गेला. या कमिटीनेही या मालाची अपसेट किंमत निश्चित केली होती.

लोकमत

# भंगारातून पीएमपीला मिळणार साडेपाच कोटी

## लिलाव प्रक्रियेत बदल : महसूल वाढणार

लोकमत न्यूज नेटवर्क




पुणे : नादुरुस्त व ताफ्यातून हद्दपार करण्यात आलेल्या बस व इतर साहित्याच्या विक्रीतून पुणे महानगर परिवहन महामंडळाला (पीएमपी) सुमारे साडेपाच कोटी रुपयांचा महसूल मिळणार आहे. लिलाव प्रक्रियेत बदल करण्यात आल्याने पहिल्यांदाच भंगारातून मिळणारा महसूल वाढल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली.

आयुर्मान संपलेल्या किंवा १२ लाख किमीपेक्षा जास्त धावलेल्या बस भंगारात काढल्या जातात. या बस विक्रीसाठी दि. २१ डिसेंबरपूर्वी घेण्यात येणाऱ्या लिलावात अल्प बोली लावण्यात येत होती. पण दि. २१ डिसेंबर रोजी घेण्यात आलेल्या लिलावासाठी सरकारमान्य अधिकाऱ्याची नेमणूक करण्यात आली. त्यामध्ये १९७ बस, २ टेम्पो आणि इतर सामान ठेवण्यात आले होते. ऑनलाईन व ऑफलाईन लिलावाची सुविधा उपलब्ध होती. यापुर्वी प्रति बसनिहाय स्क्रॅप लॉट तयार करण्यात येत होते. या वेळी तसे न करता बसच्या कंपनीप्रमाणे पाच बसचे समूह तयार करण्यात आले होते. यापूवी फक्त खात्याअंतर्गत असणारी स्क्रॅप कमिटी बसची किंमत ठरवत होती. यात मनपा, आरटीओ, राज्य परिवहन महामंडळातील अधिकाऱ्यांचा समावेश असायचा. या वेळी स्क्रॅप बसची किमान किंमत ठरविण्यासाठी सरकारमान्य मूल्यमापन करणाऱ्याची नेमणूक करण्यात आली. दोन्ही किंमतीचा विचार करुन त्यानुसार किंमत ठरविण्यात आली.

या बदलामुळे सुमारे साडेपाच कोटी रुपयांचे उत्पन्न मिळेल. आवश्यकतेनुसार बदल करण्यात येत असल्याचे पीएमपीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक राजेंद्र जगताप यांनी सांगितले